# ❖सानिया जागतिक क्रमवारीत अव्वल :-



लंडन एटीपी वर्ल्ड टूर्स फायनच्या अतिंम फेरीत दाखल झालेला भारतीय टेनिसपटू रोहन बोपन्ना जागतिक टेनिस क्रमवारीच्या दुहेरीच्या अंतिम दहा खेळाडूंमध्ये सामील झाला असून तर स्टार टेनिसपटू सानिया मिर्झा महिला दुहेरीत अव्वलस्थानी कायम आहे. बोपन्ना-फ्लोरिन मोर्गिया जोडीचा दुसरे मानाकंन प्राप्त नेदर्लंड्सचा जां ज्यूलियन आणि रोमानियाच्या होरिया टेकाऊ यांनी ६-४, ६-३ ने पराभव झाला. त्यामुळे क्रमवारीत तीन स्थानांचा लाभ झालेला बोपन्ना ९ व्या स्थानी पोहोचला आहे. तर लिएंडर पेस ४१ व्या स्थानी कायम आहे.

दुसरीकडे स्वित्झर्लंडच्या मार्टिना हिंगिसच्या साथीने दुहेरीत दमदार कामगिरी करून सानियाने वर्षाच्या अखेरीस अव्वलस्थान कायम राखले आहे. सानिया-मार्टिना यांनी अमेरिका ओपन आणि विम्बल्डन ग्रॅन्डस्लॅम व्यतिरिक्त १० डब्ल्युटीए किताब जिंकले आहेत. डब्ल्युटीए एकेरीच्या क्रमवारीत अमेरिकेची स्टार टेनिसपटू सेरेने विलियम्स अव्वलस्थानी कायम असून रोमानियाची सिमोन हालेप दुस-या तर स्पेनची गार्बाईन मुगुरुजा तिस-या स्थानी आहे.